## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १२/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१७/२०१३/जा.१९२, दिनांक १३/०३/२०१३ व २१/०३/२०१३.

३) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचा दिनांक २०/०३/२०१३ रोजी प्राप्त अहवाल.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे दिनांक ३०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/२९/१३ अन्वये दक्षता शाखेकडून दिनांक ३०/०४/२०१३ रोजी प्राप्त पृथ:करण अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१७/२०१३/जा. ४१६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०९/०५/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

### आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०४/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे व त्यांचे अधिकारी/कर्मचारी तसेच या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह दुपारी सुमारे ३.१५ वाजता मे. पी. पी. ऑईल प्रा. लि., गाळा क्रमांक ४१८ ते ४२१, मारुती कंपाऊंड, कशेळी गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे या गाळयात प्रवेश केला असता तेथील कार्यालयात उपस्थित व्यक्तिस अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर इसमास त्याचे नाव गाव व पद विचारले असता, त्याने त्याचे नाव नितीन मुलजी लोडाया असल्याचे सांगुन तो सदर ठिकाणी मॅनेजर म्हणून गेली १२ वर्षापासून नोकरी करीत असल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी सदर गाळयामध्ये कोणता व्यवसाय चालतो याविषयी उपस्थित इसमास विचारणा केली असता, त्यांनी सदर गाळयामध्ये विविध प्रकारच्या खाद्यतेलाची आवक ही टँकरमार्फत करुन गाळयामधील लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूक केली जाते व त्यानंतर खाद्यतेलावर फिल्टर्सची प्रक्रिया करुन विविध प्रकारच्या पॅकिंगमध्ये पॅक करुन डिस्ट्रिब्युटर्समार्फत विक्री केली जात असल्याचे सांगितले. कंपनीच्या मालकाबाबत चौकशी केली असता, झवेरचंद नेनशी शहा, प्रताप नेनशी शहा व प्रिन्स प्रताप शहा हे कंपनीचे संचालक असल्याचे पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. अधिकाऱ्यांनी नितीन मुलजी लोडाया यांचेकडे खाद्यतेलाच्या खरेदी, साठवणुक व विक्रीबाबतचा आवश्यक असलेल्या शिधावाटप विभागाच्या परवान्याविषयी व इतर कागदपत्राविषयी विचारणा केली असता, त्यांनी शिधावाटप यंत्रणेकडून देण्यात येणारा परवाना घेतला नाही. तसेच संबंधित कार्यालयास परवाना मिळणेकरीता अर्जही केला नसल्याचे सांगून इतर कोणतेही आवश्यक ते परवाने नसल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी नितीन मुलजी लोडाया यांचा तसा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदविला. दरम्यान अधिकाऱ्यांनी नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी येथे संपर्क साधून घटनेची माहिती कळविली व संबंधित पोलिसांना त्वरीत घटनास्थळी येणेबाबत कळविले. तद्नंतर पंच व अधिकारी यांनी कंपनीचे मॅनेजर व स्टोअर किपर यांचेसमवेत कंपनीच्या व्यवसायाच्या ठिकाणाची पाहणी केली. सदर ठिकाणी एकूण २२ लोखंडी लॉफ टँक बसवलेल्या असल्याचे आढळुन आले. त्यापैकी १० टँकमध्ये वेगवेगळया प्रकारचे आवक झालेले खाद्यतेल साठविले जाते. ते खाद्यतेल वरील लोखंडी टाकीतून पाईपद्वारे फिल्टर मशिनमध्ये फिल्टर करण्यासाठी आणले जाते. फिल्टर केलेले खाद्यतेल हे वेगळ्या १० लॉफ टँकमध्ये साठविले जाते. त्यानंतर फिल्टर केलेले खाद्यतेल साठविलेल्या त्या त्या टाकीतून पाईपद्वारे संबंधित फिलिंग मशीनद्वारे विविध क्षमतेच्या पॅकिंग युनिटमध्ये पॅक केले जात असल्याचे आढळुन आले. साधारणपणे १५ किलो, ५ लिटर, १ लिटर, ५०० मि.लि., २०० मि.लि., १०० मि.लि. व ३ मि.लि. अशा क्षमतेच्या वेगवेगळया पत्र्याचे डबे/प्लास्टीकच्या बाटल्या, जार, पाऊचमध्ये पॅकिंग केली जाते. पॅक केलेल्या डबा/बाटली/जार/पाऊचना सदर कंपनीचे वेगवेगळया नावाचे संबंधित ब्रॅन्डची लेबल्स लावली जातात. त्यानंतर स्टॉकिस्ट अथवा डिस्ट्रीब्युटर्स यांना विक्री करण्यासाठी पाठविले जात असल्याचे आढळुन आले. तसेच घटनास्थळी आढळून आलेल्या सदर ब्रॅन्डची नांवे पुढीलप्रमाणे, वनराज तिळ तेल, शिंगोला मुंगफली तेल, सरसोला राई तेल, रविरत्न रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल आणि पंचरत्न खोबरेल तेल इत्यादी. सदर कंपनीच्या ताब्यात असलेल्या खाद्यतेलाच्या साठयाची पंचासमक्ष तसेच मॅनेजर नितीन मुलजी लोडाया यांचेसमवेत व समक्ष मोजदाद केली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

0003

| अ. क्र. | तपशिल/ब्रॅण्ड | संख्या | परिमाण लिटर | एकूण तेल लि. | दर/लि. | बाजारभावाप्रमाणे अंदाजे किमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टाकी क्र १ मधील सुटे तीळ तेल | - | - | १०७१६ | १६० | १७१४५६० |
| २ | टाकी क्र २ मधील सुटे तीळ तेल | - | - | १०३६५ | १६० | १६५८४०० |
| ३ | टाकी क्र ३ | - | - | ० | ० | ० |
| ४ | टाकी क्र ४ | - | - | ० | ० | ० |
| ५ | टाकी क्र ५ | - | - | ० | ० | ० |
| ६ | टाकी क्र ६ | - | - | ० | ० | ० |
| ७ | टाकी क्र ७ | - | - | ० | ० | ० |
| ८ | टाकी क्र ८ | - | - | ० | ० | ० |
| ९ | टाकी क्र ९ | - | - | ० | ० | ० |
| १० | टाकी क्र १० | - | - | ० | ० | ० |
| ११ | टाकी क्र.११ मधील सुटे सूर्यफुल तेल | - | - | १४१७ | ७० | ९९१९० |
| १२ | टाकी क्र.१२ मधील सुटे सूर्यफुल तेल | - | - | १३५० | ७० | ९४५०० |
| १३ | टाकी क्र.१३ मधील सरसोला तेल | - | - | ६३६० | ११० | ६९९६०० |
| १४ | टाकी क्र १४ | - | - | ० | ० | ० |
| १५ | टाकी क्र.१५ मधील शेंगतेल | - | - | १३४३७ | १२० | १६१२४४० |
| १६ | टाकी क्र.१६ | - | - | ० | ० | ० |
| १७ | टाकी क्र १७ मधील तीळ तेल | - | - | ११२५० | १६० | १८००००० |
| १८ | टाकी क्र.१८ | - | - | ० | ० | ० |
| १९ | टाकी क्र १९ मधील खोबरेल तेल | - | - | ९८० | १०० | ९८००० |
| २० | टाकी क्र.२० | - | - | ० | ० | ० |
| २१ | टाकी क्र २१ मधील खोबरेल तेल | - | - | ११८७५ | १०० | ११८७५०० |
| २२ | टाकी क्र २२ मधील खोबरेल तेल | - | - | १०४३७ | १०० | १०४३७०० |
| २३ | भूमिगत टाकीमधील खोबरेल तेल | - | - | ४०० | १०० | ४०००० |
| २४ | वनराज तीळ तेल | ५०० | १.००० | ५०० | १६० | ८०००० |
| २५ | वनराज तीळ तेल | ६०० | ०.५०० | ३०० | १६० | ४८००० |
| २६ | वनराज तीळ तेल | ५०० | ०.२०० | १०० | १६० | १६००० |
| २७ | वनराज तीळ तेल | २० | ५.००० | १०० | १६० | १६००० |
| २८ | पंचरत्न खोबरेल तेल | २०८० | ०.५०० | १०४० | १०० | १०४००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २९ | पंचरत्न खोबरेल तेल | ८०० | ०.१०० | ८० | १०० | ८००० |
| ३० | पंचरत्न खोबरेल तेल | १०० | ०.२०० | २० | १०० | २००० |
| ३१ | पंचरत्न खोबरेल तेल | ५१८४ | ०.०२५ | १२९.६ | १०० | १२९६० |
| ३२ | सरसोला | ३००० | ०.२०० | ६०० | ११० | ६६००० |
| ३३ | सरसोला | २५२० | ०.५०० | १२६० | ११० | १३८६०० |
| ३४ | सरसोला | २०१६ | ०.१०० | २०१.६ | ११० | २२१७६ |
| ३५ | सरसोला | १२६० | १.००० | १२६० | ११० | १३८६०० |
| ३६ | सरसोला | १५० | २.००० | ३०० | ११० | ३३००० |
| ३७ | सरसोला | ३५०० | ०.२०० | ७०० | ११० | ७७००० |
| ३८ | शिंगोला शेंगतेल | १८० | १.००० | १८० | १२० | २१६०० |
| ३९ | शिंगोला शेंगतेल | ३५० | २.००० | ७०० | १२० | ८४००० |
| ४० | पंचरत्न खोबरेल तेल (पाऊच) | ११४४३२ | ०.०५० | ५७२१.६ | १०० | ५७२१६० |
| ४१ | पंचरत्न खोबरेल तेल (पाऊच) | ७२००० | ०.००३ | २१६ | १०० | २१६०० |
| ४२ | पंचरत्न खोबरेल तेल (पाऊच) | ८६४० | ०.०५० | ४३२ | १०० | ४३२०० |
| | एकूण | | | ९२४२८ | | १,१५,५२,७८६ |

अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सदर कंपनीत विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा एकूण ९२४२८ लिटर एवढा साठा घटनास्थळी आढळून आला. दरम्यान घटनास्थळी पोलीस हवालदार श्री. युवराज जयराम पाटील, बक्कल क्रमांक २३९९ व पोलिस नाईक श्री. प्रविणकुमार गुलाब जाधव, बक्कल क्रमांक ४४१६, नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी हे हजर झाले. त्यांना घटनेची रितसर माहिती अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष दिली. याबाबत घटनास्थळी उपस्थित असलेले मॅनेजर नितीन मुलजी लोडाया यांचेकडे अधिकाऱ्यांनी सदर खाद्यतेल कोणाकडून खरेदी करता याबाबत विचारणा करुन त्याबाबतची खरेदी बिले मागितली असता, नितीन मुलजी लोडाया यांनी कोणतीही खरेदी बिले अथवा विक्री बिले नाहीत असे सांगितले व त्यांनी ती सादर केली नाहीत. तसेच घटनास्थळी आवक झालेल्या तसेच विक्री केलेल्या खाद्यतेलाच्या कोणत्याही नोंदवहया, अभिलेख ठेवले नाहीत, असे त्यांनी चौकशीत अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. त्यामुळे सदर कंपनीत खाद्यतेलाच्या खरेदी व विक्रीचा व्यवसाय हा पुर्णपणे विनापरवाना, अवैधरित्या चालू आहे असे अधिकाऱ्यांना व पंचांना प्रथमदर्शनी दिसुन आले. त्यामुळे सदर तपासणीत आढळलेला संपुर्ण खाद्यतेलाचा साठा व कंपनीतील सर्व संबंधित मुद्देमालाची नोंद घेऊन तो सर्व मुद्देमाल पुढील आदेशापर्यंत जागीच जप्त करावा असे अधिकाऱ्यांनी व पंचांनी ठरविले.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे सदर कंपनीत असलेला खाद्यतेलाचा एकूण ९२४२८ लिटर साठा ज्याचा तपशिल तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे बाजारभावाप्रमाणे अंदाजित किंमत काढून आहे त्या स्थितीत घटनास्थळी जागीच जप्त करण्यात आला. सदरचा संपुर्ण सुटा व पॅक केलेला खाद्यतेलाचा साठा प्रत्यक्षात हलविणे शक्य नाही.

तो ठेवण्यासाठी कंपनीच्या संचालकाकडे वेगळे गोदाम उपलब्ध नाही ही वस्तूस्थिती विचारात घेऊन सदरचा संपुर्ण साठा हा महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम १५(सी) अन्वये जागीच जप्त करुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. त्याचप्रमाणे कंपनीतील इतर सर्व मुद्देमाल खालीलप्रमाणे त्याची बाजारभावाप्रमाणे अंदाजित किंमत काढून आहे त्या स्थितीत जागीच जप्त करण्यात आला व पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

| अ.क्र. | तपशिल | संख्या | बाजारभावाप्रमाणे अंदाजे किमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | रिकामी टाकी क्र १ ची किंमत | १ | ५०००० |
| २ | रिकामी टाकी क्र २ ची किंमत | १ | ५०००० |
| ३ | रिकामी टाकी क्र ३ ची किंमत | १ | ५०००० |
| ४ | रिकामी टाकी क्र ४ ची किंमत | १ | ५०००० |
| ५ | रिकामी टाकी क्र ५ ची किंमत | १ | ५०००० |
| ६ | रिकामी टाकी क्र ६ ची किंमत | १ | ५०००० |
| ७ | रिकामी टाकी क्र ७ ची किंमत | १ | ५०००० |
| ८ | रिकामी टाकी क्र ८ ची किंमत | १ | ५०००० |
| ९ | रिकामी टाकी क्र ९ ची किंमत | १ | ५०००० |
| १० | रिकामी टाकी क्र १० ची किंमत | १ | ५०००० |
| ११ | रिकामी टाकी क्र ११ ची किंमत | १ | ५०००० |
| १२ | रिकामी टाकी क्र १२ ची किंमत | १ | ५०००० |
| १३ | रिकामी टाकी क्र १३ ची किंमत | १ | ५०००० |
| १४ | रिकामी टाकी क्र १४ ची किंमत | १ | ५०००० |
| १५ | रिकामी टाकी क्र १५ ची किंमत | १ | ५०००० |
| १६ | रिकामी टाकी क्र १६ ची किंमत | १ | ५०००० |
| १७ | रिकामी टाकी क्र १७ ची किंमत | १ | ५०००० |
| १८ | रिकामी टाकी क्र १८ ची किंमत | १ | ५०००० |
| १९ | रिकामी टाकी क्र १९ ची किंमत | १ | ५०००० |
| २० | रिकामी टाकी क्र २० ची किंमत | १ | ५०००० |
| २१ | रिकामी टाकी क्र २१ ची किंमत | १ | ५०००० |
| २२ | रिकामी टाकी क्र २२ ची किंमत | १ | ५०००० |
| २३ | रिकामी भुमिगत टाकीची किंमत | १ | २०००० |
| | एकूण | | ११,२०,००० |

DEPUTY DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

| अ. क्र. | तपशिल | बॉक्स | नग | एकूण | अंदाजित दर | बाजारभावा प्रमाणे अंदाजे किमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| | युनिट-१, तळमजला | | | | | ० |
| १ | २०० मि.लि. क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या | ३१७ | १०० | ३१७०० | ७ | २२१९०० |
| २ | ५०० मि.लि.क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या | १६१ | ४० | ६४४० | १० | ६४४०० |
| | युनिट-१, पोटमाळा | | | | | ० |
| ३ | बॉक्स करिता मोठे पुठ्ठे बंडल | २५० | २० | ५००० | १० | ५०००० |
| ४ | बॉक्स करिता लहान पुठ्ठे बंडल | १०० | ५० | ५००० | १० | ५०००० |
| ५ | ५ लि क्षमतेचे रिकामे जार | ३६ | १८ | ६४८ | ४० | २५९२० |
| ६ | १०० मि.ली. क्षमतेच्या रिकाम्या बाटल्या | ४४ | ८०० | ३५२०० | ५ | १७६००० |
| | युनिट-२, तळमजला | | | | | ० |
| ७ | ५०० मि.लि.क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या | २०० | ४० | ८००० | १० | ८०००० |
| ८ | ५०० मि.लि.क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या | ३२ | ४० | १२८० | १० | १२८०० |
| ९ | २०० मि.लि.क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या | ३४ | १०० | ३४०० | ७ | २३८०० |
| १० | ५०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकाम्या बाटल्या | ६८ | ४० | २७२० | १० | २७२०० |
| ११ | ५०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकामे पाऊच | १ | १०० | १०० | १० | १००० |
| १२ | १ लि.क्षमतेचे वनराज रिकाम्या बाटल्या | २१३ | २० | ४२६० | १५ | ६३९०० |
| १३ | १ लि.क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या | ३३६ | २० | ६७२० | १५ | १००८०० |
| १४ | २०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकाम्या बाटल्या | २४ | १०० | २४०० | ७ | १६८०० |
| १५ | ५०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकाम्या बाटल्या | ६७ | ४० | २६८० | १० | २६८०० |
| १६ | २०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकाम्या बाटल्या | २१० | १०० | २१००० | ७ | १४७००० |
| १७ | १५ लि.क्षमतेचे पत्र्याचे रिकामे डबे | ७९५ | १ | ७९५ | ४० | ३१८०० |
| १८ | ५०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकाम्या बाटल्या | २६ | ४० | १०४० | १० | १०४०० |
| १९ | ५० मि.लि.क्षमतेच्या रिकामी बाटल्यांच्या गोणी | ८ | १००० | ८००० | २ | १६००० |
| २० | २०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकाम्या बाटल्या | १९९ | १०० | १९९०० | ७ | १३९३०० |
| | युनिट-२, पोटमाळा | | | | | ० |
| २१ | २०० मि.ली. क्षमतेच्या वनराज तील तेल रिकामी बाटल्या | २५८ | १०० | २५८०० | ७ | १८०६०० |
| २२ | ५ लि. क्षमतेचे नाव नसलेले हिरव्या रंगाचे रिकामे कॅन | ३४ | १२ | ४०८ | ५० | २०४०० |
| २३ | ५ लि. क्षमतेचे नाव नसलेले हिरव्या रंगाचे रिकामे कॅन | ११ | १२ | १३२ | ५० | ६६०० |
| २४ | ५ लि. क्षमतेचे नाव नसलेले लाल रंगाचे रिकामे कॅन | ३ | १२ | ३६ | ५० | १८०० |
| २५ | ५ लि. क्षमतेचे नाव नसलेले लाल रंगाचे रिकामे कॅन | १६ | १२ | १९२ | ५० | ९६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | ५ लि. क्षमतेचे पंचरत्न नाव असलेले निळ्या रंगाचे रिकामे कॅन | ११ | १२ | १३२ | ५० | ६६०० |
| २७ | ५ लि. क्षमतेचे पंचरत्न नाव असलेले निळ्या रंगाचे रिकामे कॅन | ७ | २० | १४० | ५० | ७००० |
| २८ | १०० मि.लि. क्षमतेचे पंचरत्न नांव असलेले रिकामे पाऊच रोल | ६५ | १ | ६५ | ५ | ३२५ |
| २९ | ३ मि.लि. क्षमतेचे पंचरत्न नाव असलेले रिकामे पाऊच रोल | १५० | १ | १५० | ०.२५ | ३७.५ |
| ३० | २५ मि.लि. क्षमतेचे पंचरत्न नाव असलेले रिकामे पाऊच रोल | ९२ | १ | ९२ | ०.५० | |
| ३१ | बाटलीच्या ढाकणांच्या गोणी (मोठ्या) | ६५ | २५ | १६२५ | १ | १६२५ |
| ३२ | बाटलीच्या ढाकणांच्या गोणी (लहान) | ७७ | ६ | ४६२ | ०.५० | २३१ |
| ३३ | १०० मि.लि.क्षमतेचे पंचरत्न रिकामे जार असलेल्या गोणी | २५ | ५०० | १२५०० | ७ | ८७५०० |
| ३४ | २०० मि.लि.क्षमतेचे सरसोला रिकाम्या बाटल्या असलेले | ६६ | १०० | ६६०० | १० | ६६००० |
| | युनिट-३, पोटमाळा | | | | | ० |
| ३५ | ५ लि.क्षमतेचे लाल रंगाचे कॅन | ३० | १२ | ३६० | ५० | १८००० |
| ३६ | ५ लि.क्षमतेचे लाल रंगाचे कॅन | १४ | १२ | १६८ | ५० | ८४०० |
| ३७ | ५ लि.क्षमतेचे पिवळ्या रंगाचे कॅन | ९९ | १२ | ११८८ | ५० | ५९४०० |
| ३८ | ५ लि.क्षमतेचे पिवळ्या रंगाचे कॅन | २० | १२ | २४० | ५० | १२००० |
| ३९ | ५ लि.क्षमतेचे पिवळ्या रंगाचे कॅन | ३२ | १२ | ३८४ | ५० | १९२०० |
| ४० | ५ लि.क्षमतेचे पिवळ्या रंगाचे कॅन | ३७ | १२ | ४४४ | ५० | २२२०० |
| ४१ | २ लि.क्षमतेचे पिवळ्या रंगाचे कॅन | ११ | ३५ | ३८५ | २० | ७७०० |
| ४२ | २ लि.क्षमतेचे पिवळ्या रंगाचे कॅन | ८४ | ३० | २५२० | २० | ५०४०० |
| ४३ | २ लि.क्षमतेचे हिरव्या रंगाचे कॅन | २५ | ३५ | ८७५ | २० | १७५०० |
| ४४ | २ लि.क्षमतेचे लाल रंगाचे कॅन | ४ | ३५ | १४० | २० | २८०० |
| ४५ | मोटारपंप ३ हॉर्स पॉवर क्षमतेचा | - | - | १ | १०००० | १०००० |
| ४६ | फिल्टर प्रेस मशिन | | | २ | २५०००० | ५००००० |
| ४७ | फिलींग मशिन | | | १२ | ७०००० | ८४०००० |
| ४८ | मोठी पॉवर फिलींग मशिन | | | १ | १५०००० | १५०००० |
| ४९ | पाऊच प्रिंटींग मशिन | | | १ | १००००० | १००००० |
| ५० | ५ हॉर्स पॉवर क्षमतेचा किर्लोस्कर कंपनीचा पंप क्र.०८८३९/२६३ | | | २ | १३००० | २६००० |
| ५१ | असेंबल्ड जनरेटर | | | १ | १५०००० | १५०००० |
| | **एकूण** | | | | | ३६,६७,७६८.५ |

जप्त केलेल्या संपूर्ण मुद्देमालाची एकूण किंमत रुपये १,६३,४०,५७१/- (अक्षरी एक कोटी त्रेसष्ट लाख चाळीस हजार पाचशे एकाहत्तर रुपये फक्त) आहे.

त्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी तपासणीत आढळून आलेल्या दोषाबाबत व आढळून आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत नितीन मुलजी लोडाया यांना विचारणा केली असता, त्यांनी ज्याप्रमाणे सांगितले त्याप्रमाणे त्यांचा वेगळा जबाब नोंदविला.

सदर कंपनीत लोखंडी लॉफ टाक्या व भुमिगत टाकी यापैकी ज्या टाक्यांमध्ये खाद्यतेल आहे त्या प्रत्येक टाकीतील प्रत्येकी ५०० मि.लि. क्षमेतेच्या पारदर्शक प्लॅस्टीकच्या स्वच्छ व रिकाम्या पारदर्शक बाटल्यांमध्ये पंचासमक्ष व मॅनेजर नितीन मुलजी लोडाया यांचेसमक्ष खाद्यतेलाचे नमुने नियमानुसार रासायनिक पृथ:करणासाठी घेण्यात येऊन ते पंचासमक्ष जागीच सिलबंद करण्यात आले व त्यांना क्रमांक देण्यात आला. त्याचा तपशिल तक्ता क्रमांक ४ मध्ये दर्शविण्यात आला आहे. त्यापैकी नमुना क्रमांक A४ ते K४ असे एकूण ११ सिलबंद नमुने पंचासमक्ष कंपनीचे मॅनेजर नितीन मुलजी लोडाया यांच्या ताब्यांत देण्यात येवुन नमुना क्रमांक A३ ते K३ असे एकूण ११ सिलबंद नमुने पोलिसांच्या ताब्यांत देण्यात आले.

अशाप्रकारे, मे. पी. पी. ऑईल प्रा. लि. चे संचालक झवेरचंद नेनशी शहा, प्रताप नेनशी शहा व प्रिन्स प्रताप शहा या सर्वांनी मिळून खाद्यतेलाचा कोणताही परवाना धारण केलेला नसून विनापरवाना मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाची साठवणूक करुन अवैध खरेदी व विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० च्या तरतूदीचा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. ΙΙ १९/२०१३, दिनांक ०५/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १९/०३/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १९/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच मे. पी. पी. ऑईल या कंपनीच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक २६/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०३/२०१३ रोजीच्या अंतीम सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच मे. पी. पी. ऑईल या कंपनीच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सदर प्रकरणी मे. पी. पी. ऑईल या कंपनीस पुरेशी संधी देऊन देखील ते उपस्थित राहिले नाहीत. यावरुन त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे तसेच नोटीसमधील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचेकडून वाचावे क्र. ५ अन्वये प्राप्त झालेल्या रासायनिक पृथःकरण अहवालामध्ये " and I am of the opinion that above samples No Q-12, Q-26, Q-38, Q-45, Q-28, Q-19 and Q-77 confirm to the standards of Til Oil, Sunflower Oil, Mustard Oil, Groundnut Oil, as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011, respectively with respect to above parameters and I am of the opinion that above samples No Q-88, Q-99, Q-42 and Q-48 confirm to the standards of Coconut Oil as per (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011 with respect to above parameters", असे नमूद आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

DIRECTORATE OF CIVIL SUPPLIES ... D OFFICE

**युक्तिवाद :-**

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचे दिनांक २०/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेल्या अहवालात, मे. पी.पी. ऑईल प्रा.लि. या कंपनीने घाऊक/मिलर्स/ऑईल मिलचा परवाना मिळण्याकरीता त्यांच्या कार्यालयांत अर्ज सादर केलेला नाही, असे नमूद केले आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे दिनांक ३०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, नमुद गुन्ह्यातील आरोपीत मे. पी.पी. ऑईल प्र.लि. गाळा नं. ४१८ ते ४२१ मारुती कम्पाऊन्ड कशेळी, ता. भिवंडी या कंपनीचे संचालक १) झवेरचंद नेवशी शहा २) प्रताप नेनशी शहा ३) प्रिन्स प्रताश शहा यांनी मा. सत्र न्यायालय ठाणे येथे त्यांना सदर गुन्ह्यात अटकपूर्व जामिन मंजूर होणेसाठी अर्ज क्रमांक ४४१/२०१३ दाखल केलेला होता. मा. सत्र न्यायालयाने आदेश क्र. सीआरआय नं. ३६५३/२०१३ दि. ११.०३.२०१३ अन्वये आरोपींना अटक केल्यास १५०००/- रुपये वैयक्तिक जातमुचलका व एक अगर दोन जामिनदारांचे बंधपत्र लिहून

घेऊन सोडण्यात यावे तसेच आरोपींनी दर मंगळवारी व गुरुवारी पोलिस ठाणेत हजर राहून पोलिसांना तपासकामात सहाकार्य करावे असे आदेश दिलेले आहेत. दिनांक १९/०३/२०१३ रोजी अटकपूर्व जामिन अर्जाची सुनावणी मा. न्यायालयात ठेवण्यात आलेली होती. सदर तारखेस मा. न्यायालयाने सदरहू अटकपूर्व जामिन अर्जाची सुनावणी दिनांक २६/०३/२०१३ रोजी ठेवलेली आहे. मा. सत्र न्यायालय ठाणे यांनी आरोपींचे अटकपूर्व जामिन अंतीम आदेश दिलेनंतर पुढील तपास करीत आहोत. त्याचप्रमाणे, शिधावाटप अधिकारी यांनी जप्त केलेला खाद्यतेलाचा साठा सरकार जमा करणेबाबत निर्णय आपले स्तरावर घेणेस यावा, अशी विनंती केली आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०४/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे व त्यांचे अधिकारी/कर्मचारी तसेच या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह मे. पी. पी. ऑईल प्रा. लि., गाळा क्रमांक ४१८ ते ४२१, मारुती कंपाऊंड, कशेळी गांव, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे या गाळयात धाड टाकली असता, मे. पी. पी. ऑईल प्रा. लि. चे संचालक झवेरचंद नेनशी शहा, प्रताप नेनशी शहा व प्रिन्स प्रताप शहा या सर्वांनी मिळून खाद्यतेलाचा कोणताही परवाना धारण केलेला नसून विनापरवाना मोठया प्रमाणावर खाद्यतेलाची साठवणूक करुन अवैध खरेदी व विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० च्या तरतूदीचा भंग केल्याने त्यांचेविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II १९/२०१३, दिनांक ०५/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण १,६३,४०,५७१/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

सदर प्रकरणी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात, मे. पी.पी. ऑईल प्रा.लि. या कंपनीने घाऊक/मिलर्स/ऑईल मिलचा परवाना मिळण्याकरीता त्यांच्या कार्यालयात अर्ज सादर केलेला नाही, असे नमूद केले आहे.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

**महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती** आदेश, १९९८ चे कलम २(e) अन्वये, "Dealer" means- a person engaged in the business of purchase, sale or storage for sale of any one or more of the scheduled commodities, असे नमूद आहे.

कलम २(f) अन्वये, "Edible oils" means- any oils used for cooking for human consumption and includes hydrogenated vegetable oils, असे नमूद आहे.

कलम २(z)(vi) अन्वये, "In relations to any edible oilseeds or edible oil a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of purchase, sale or storage for sale edible oilseeds or edible oils in quantities exceeding twenty quintals at any one time to other dealers or other persons at wholesale rates and includes a commission agent or a sub-wholesalers, who holds stocks of edible oilseeds or edible oils in the conduct of his business", असे नमूद आहे.

कलम २(x) अन्वये, "schedule commodity" means- any of the commodities specified in schedule appended to this order, असे नमूद आहे.

कलम २(x) अन्वये नमुद अनुसुचित वस्तुंच्या यादीमधील अनुक्रमांक ४ अन्वयें खाद्यतेलबियांची यादी विषद केली असुन त्यामध्ये, Oilseeds- (i) Groundnut (ii) Sunflower or Kardi (iii) Sesamum or Til (iv) Cotton seed (v) Sunflower, (vi) Mustard, (vii) Linseed (viii) Soyabean, (ix) Copra, (x) Khurasani and Nigerseed, असे स्पष्ट नमुद आहे

कलम २(x) अन्वये नमुद अनुसुचित वस्तुंच्या यादीमधील अनुक्रमांक ५ अन्वये, Oils- The palmolein oil, Rapeseed oil or any other oils prepared from oil seeds specified above (whether raw, filtered or refined), असे स्पष्ट नमुद आहे.

कलम ३(b) अन्वये, - No person shall carry on business as a wholesale dealer in any one or more of the scheduled commodities except in accordance with the terms and conditions of all licence under this order, असे नमुद आहे.

उपरोक्त नमुद आदेशामधील तरतूदींचे अवलोकन करता, मे. पी.पी. ऑईल्स प्रा. लि. या कंपनीने घटनास्थळी असलेल्या गाळ्यात विविध खाद्यतेलाचा साठा हा मोठया प्रमाणात साठवणुक केला असल्याने नमुद कंपनीस वरील नमुद आदेशाच्या कलम २(z)(vi) अन्वये खाद्यतेलासाठी घाऊक परवाना धारण करणे बंधनकारक आहे. तसेच कलम ३(b) अन्वये नमुद बाबींचे अवलोकन करता, केवळ कमीशन एजन्ट जे घाऊक व्यापारी अथवा उत्पादक यांच्यावतीने व्यवसायांत सहभागी असल्यास परंतु ते कोणताही साठा संपादन करुन साठवणुक करीत नसल्यास त्यांना नमुद आदेशामधील तरतुदींच्या अनुषंगाने घाऊक परवाना घेण्यापासुन सुट देण्यात आल्याचे नमुद आहे. तसेच कलम २(x) अन्वये नमूद खाद्यतेलबियांचा साठा व त्यापासुन तयार करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा अनुसुचित वस्तुंच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याची बाब प्रकर्षाने नमुद करावीशी वाटते. सदर प्रकरणी मे. पी.पी. ऑईल्स प्रा. लि. या कंपनीने स्थानिक बाजारपेठेतुन विविध प्रकारचा खाद्यतेलाचा सुटा साठा हा मोठया प्रमाणात खरेदी करुन तो विविध क्षमतेच्या पॅकींगमध्ये पॅक करुन वितरकांच्या माध्यमातुन विक्री करण्यासाठी त्यांनी नमुद गाळ्यात साठवणुक केला असल्याने त्यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ या आदेशान्वये खाद्यतेलाच्या खरेदी, साठवणुक व विक्री करीता घाऊक परवाना धारण करणे आवश्यक आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. पी.पी. ऑईल्स प्रा. लि. या कंपनीच्या संचालकांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब अन्वये सुनावणीची पुरेशी संधी देण्यात आली. परंतु, सदर कंपनीच्या वतीने संचालक अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी हे सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त साठा परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

मे. पी.पी. ऑईल्स प्रा.लि. या कंपनीचा घटनास्थळी खाद्यतेलाचा व्यवसाय कार्यरत आहे. सदर कंपनीत विविध खाद्यतेलाचा सुटा साठा खरेदी करुन सदरचा टँकरमार्फत प्राप्त झालेल्या साठ्याची लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूक करुन तद्नंतर खाद्यतेलावर फिल्टरची प्रक्रिया करुन विविध प्रकारच्या व क्षमतेच्या पॅकीगमध्ये पॅक करुन वितरकांमार्फत विक्री केली जात असल्याचे दिसुन येते. मे. पी.पी. ऑईल्स प्रा.लि. या कंपनीचे व्यवस्थापक नितीन मुलजी लोडाया यांनी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात नमूद कंपनीकडे खाद्यतेलाच्या खरेदी, साठवणूक व विक्रीबाबतचा आवश्यक असलेला महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये परवाना

नसल्याचे तसेच सदरचा परवाना मिळण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचेकडे अर्जही केला नसल्याचे कबुल केले आहे. सदर प्रकरणी पथकाने तपासणीच्यावेळी विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा ९२४२८ लिटर म्हणजेच ८४१.०९ क्विंटल साठा जप्त केला आहे. सदर साठ्यासंदर्भात घटनास्थळी उपस्थित व्यवस्थापक यांनी पथकास कोणतीही खरेदी बिले, विक्री बिले, नोंदवह्या इत्यादी अभिलेख उपलब्ध नसल्याचे सांगून ते सादर केले नाहीत. त्यामुळे मे. पी.पी. ऑईल्स प्रा.लि. या कंपनीने नमुद गाळ्यात साठवणुक केलेल्या खाद्यतेलाचा साठा हा विना खरेदी बिलांचा खरेदी व साठवणुक करुन त्यांचा सुरु असलेला व्यवसाय हा पुर्णपणे बेकायदेशीर व विनापरवाना असल्याचे सिध्द होत आहे. मे. पी.पी. ऑईल्स प्रा.लि. या कंपनीस कलम २(z)(vi) अन्वये २० क्विंटल पर्यंत विनापरवाना साठवणूक करण्याची मुभा आहे. सबब, मे. पी.पी. ऑईल्स प्रा.लि. यांचा जप्त करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या सुटा व पॅकबंद डब्यांमधील एकूण ८४१.०९ क्विंटल खाद्यतेलाच्या साठ्यापैकी २० क्विंटल साठा हा मुक्त करण्याच्या तसेच उर्वरीत विनापरवाना असलेला ८२१.०९ क्विंटल खाद्यतेलाचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II १९/२०१३, दिनांक ०५/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या सुटा व पॅकबंद डब्यांमधील विविध प्रकारचा एकूण ८४१.०९ क्विंटल खाद्यतेलाच्या साठयापैकी २० क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा बंधपत्र घेऊन मुक्त करण्यात यावा.

२) उपरोक्त प्रमाणे २० क्विंटल खाद्यतेलाचा साठा मुक्त केल्यानंतर उर्वरीत विनापरवाना असलेला ८२१.०९ क्विंटल खाद्यतेलाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला ८२१.०९ क्विंटल खाद्यतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या विविध क्षमतेच्या रिकाम्या बाटल्या/कॅन/पाऊच/जार इ. वस्तू पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) प्रस्तूत प्रकरणी, मे. पी.पी. ऑईल्स प्रा.लि. या कंपनीचे जप्त करण्यात आलेल्या टाक्या, मोटारपंप, फिल्टर प्रेस मशिन, फिलिंग मशिन, पॉवर फिलिंग मशिन, पाऊच प्रिटींग मशिन, किर्लोस्कर कंपनीचा पंप, असेम्बल्ड जनरेटर इ. साहित्य हे उदरनिर्वाहाचे साधन असल्याने ते क्षतिपुर्ती बंधपत्र घेऊन परत करण्यात यावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
१) मे. पी. पी. ऑईल प्रा. लि. चे संचालक झवेरचंद नेनशी शहा
२) मे. पी. पी. ऑईल प्रा. लि. चे संचालक प्रताप नेनशी शहा
३) मे. पी. पी. ऑईल प्रा. लि. चे संचालक प्रिन्स प्रताप शहा
४) मे. पी. पी. ऑईल प्रा. लि. चे मॅनेजर नितीन मुलजी लोडाया
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,
१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI